(8)



परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कामगार कल्याण विभाग
क्रमांक –काक/3/कावि/560/2013
दिनांक 25 ऑक्टोबर 2013.10.19

विषय :– कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 ची पुर्तता करणेबाबत.
संदर्भ :– परिपत्रक क्रमांक काक/3/कावि/444/2013 दिनांक – 12.8.2013

2/-- मा. कामगार व कायदा मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक 8.01.2011 राजपत्र (The Gazete of India) प्रसिध्द केलेले आहे. या राजपत्रानुसार भविष्य निर्वाह कायदा 1952 ची अंमलबजावणी महानगरपालिकेस बंधनकारक आहे. या कायदयानुसार प्रत्येक संस्थेस भविष्य निर्वाह निधी कोड नंबर लागू करण्यात आलेला आहे. या कायदयाच्या तरतुंदीची अमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य मालक (Principle Employer) म्हणून महानगरपालिकेची आहे. यातील मुख्य तरतुदी म्हणून महानगरपालिकेच्या अधिन असणा–या सर्व कंत्राटी कामगार, तात्पुरत्या स्वरूपाचे कामगार, घंटागाडी कामगार, बदली कामगार, कॉन्ट्रक्ट कामगार, शिकाऊ कामगार इत्यादी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे महानगरपालिकेसाठी काम करणारे अथवा महानगरपालिकेतर्फे लावण्यात येणा–या सर्व कर्मचा–यांचा/कामगारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

महानगरपालिकेमध्ये ठेकेदारी पध्दतीने दिलेल्या कामांवर नेमण्यात आलेले कामगार अथवा ठेकेदारांने नेमलेल्या कामगारांच्या पी.एफ. वसूलीबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस भविष्य निर्वाह निधी कायदा कलम 7 ए अंतर्गत नोटिस बजावली असून सुनावणी दिनांक 30.10.2013 रोजी दुपारी 3.00 वाजता ठेवण्यात आलेली आहे. सुनावणीच्यावेळी महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागांनी नियुक्त केलेल्या कंत्राटदारांनी नेमलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी भरल्याबाबतची चलने, अनुषंगीक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

भविष्य निर्वाह निधी कायदान्वये नियुक्त कामगारांचे वेतन (बेसीक अधिक डी.ए.) रक्कम रूपये 6,500/- पेक्षा जास्त होते त्यास भविष्य निर्वाह निधी भरणे अनिवार्य नाही. तथापि सदर कामगारास भविष्य निर्वाह निधीचा नंबर दिला गेला असल्यास किंवा सदर कामगाराचा भविष्य निर्वाह निधी पुर्वी भरला जात असल्यास अशा कामगाराचा भविष्य निर्वाह निधी भरावा लागेल. सबब, दिनांक 8.1.2011 पासून महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या कंत्राटदारांमार्फत नेमलेल्या सर्व कामगारांचा भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरल्याबाबत खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावयाची आहेत.

1- नियुक्त कंत्राटी कामगाराचे हजेरीपत्रक.

2- कंत्राटदाराने कामगारांचे वेतनपत्रक तयार करून ठेवणे.

3- भविष्य निर्वाह निधी डिडक्शन रजिस्टर.

4- ज्या ठेकदारांनी भविष्य निर्वाह निधी कोड घेतलेला नाही, त्या ठेकेदाराकडे काम करीत असलेल्या कामगारांना केंद्रीय पध्दतीने भविष्य निर्वाह निधीचा नंबर देणे.

5- कंत्राटी कामगारांच्या वारसांचे दोन नंबरचे प्रपत्र भरून घेणे.

6- प्रत्येक महिन्यास भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे नंबर 9 चा रिटर्न फॉर्म भरून पाठविणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

7- ठेकेदारांकडून काम सोडून गेलेल्या कामगारांसाठी प्रपत्र 10 चा फॉर्म भरून भविष्य निर्वाह निधी आयुक्तांना पाठविणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे.

8- दर महिन्याला सर्व कामगारांचा इलेक्ट्रॉनिक कॉन्ट्रीब्युशन रिटर्न (ईसीआर) भरून पाठविणे आवश्यक आहे..

9- सर्व कामगारांचे वार्षीक विवरणपत्र फॉर्म नंबर 3ए, 6ए, 12ए रिक्वीजेशन स्टेटमेंट दर वर्षाच्या 15 एप्रीलच्या आत पाठविणे आवश्यक आहे.

10- कामगार कल्याण विभागाकडून वेळावेळी पाठपुरावा करूनही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने भविष्य निर्वाह निधी रकमेबाबत पुर्तता केली नसल्याने भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने महानगरपालिकेस 7 ए ची नोटिस बजावली आहे. सबब, भविष्य निर्वाह निधीबाबत कंत्राटदारांकडून त्वरीत पुर्तता करून घेण्याची जबाबदारी संबधीत विभाग प्रमुखांची असून सर्व संबधीत विभागाना या परिप्त्रकाद्वारे कळविण्यात येते की

त्यांच्या विभागामार्फत नेमण्यात आलेल्या कंत्राटदारांनी भविष्य निर्वाह निधी भरल्याबाबत एक महिन्याच्या आत वर उल्लेखीत सर्व कागदपत्रे विभाग स्तरावर अदययावत करून ठेवावीत. याकामी कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा अपेक्षित नाही. तसेच ठेकेदाराकडून सदर तरतुदीप्रमाणे अंमलबजावणी करून घेण्याची जबाबदारी संबधीत विभागाची आहे याचीही नोंद घेण्यात यावी.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411 018

epfpariptrak